नि.फौ.ख.क्र.१९/२०१८.
सरकार/ मधुकर व इतर
नि.क्र.२४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | : | **शेख शरीफ शेख नईम,** |
| **वय** | : | **४९ वर्षे, व्यवसाय : व्यापार,** |
| **राहणार** | : | **सहकार नगर, प्लॉट नं.७, नागपूर** |

**सरतपासणी-सहा.सरकारी अभियोक्ता श्री. डी.आय.बारस्कर यांच्यामार्फत शपथेवर सूरुः-**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र. १,२ व ४ आज न्यायालयात हजर आहेत. माझा ट्रांसपोर्टचा व्यवसाय आहे. माइ-याकडे सन-१९८५ पासुन ट्रक आहेत. सन-२०१७ मध्ये माइ-याकडे ट्रक क्रमांक एम.एच.-३३/४३५६ हा होता. घटनेच्या वेळेस सदर गाडीवर आरोपी क्र.२ मोहम्मद शकील हा चालक होता. घटनेच्या दिवशी माझा सदर ट्रक हा राजाराम कास्टींग कंपनी, हिंगणा एमआयडीसी येथे लागली होती. तेव्हा सदर गाडी ही लोखंडी स्क्रॅप भरुन ईशान कास्टींग कंपनी, एमआयडीसी बूटीबोरीकडे माल पोहोचविण्याकरीता जात होती. मी फिर्यादीला ओळखतो. फिर्यादी हा ईशान कास्टींग कंपनीचा एम.डी. होता. तेव्हा फिर्यादीने मला फोन करुन सांगीतले की, माइ-या गाडीमध्ये जेवढा लोखंडी स्क्रॅप टाकला होता/लोड केला होता, तेवढा लोखंडी स्क्रॅप हा ईशान कास्टींग कंपनी, एमआयडीसी बूटीबोरी येथे पोहोचला नाही. त्यानंतर पोलीस स्टेशनला तक्रार दिली व पोलीसांनी तो लोखंडी स्क्रॅप जप्त केला.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. यू.सी.घांगरेकर यांचे मार्फत सूरुः-**

सदर गहाळ झालेल्या लोखंडी स्क्रॅपबबद्यल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने माइ-याकडे चालक म्हणुन कधीही काम केले नाही.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

वा.दा.ब.अ.क. केले.

माझे समक्ष,

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2025.11.28 18:12:48 +0530

हिंगणा.
दि.२८.११.२०२५

(व्ही.एच.खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिंगणा.